# 'जी.डी.'तील यशासाठी...

मीटिंग हा शब्द आजकाल अगदी दोघांनी एकत्र येऊन मारलेल्या गप्पांनाही वापरला जातो आणि कोणत्याही सार्वजनिक/ खासगी विषयावर चारचौघांनी केलेल्या चर्चेलाही वापरला जातो. परंतु कार्पोरेट जगतामध्ये या शब्दाचा अन्वयार्थ खऱ्या अर्थाने कंपनीच्या फायद्यासाठी अथवा कंपनीला दैनंदिन व्यवहारात आलेल्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी उपयोजिला जातो.

प्रत्येक आस्थापनामध्ये कामकाजाची सुरवात 'मीटिंग'ने होते व दिवसभर त्यांचे सत्र चालू असते. व्यवस्थापकपदावर काम करणाऱ्यांना त्यांच्या सहकाऱ्यांकडून कंपनीच्या योग्य व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली माहिती वेगवेगळ्या रिपोर्टसच्या स्वरूपात गोळा करावयाची असते. अशा माहितीचे विश्लेषण करणे, हा या मीटिंगचा अजेंडा असतो. एक्झिक्युटिव्ह म्हणून काम करणाऱ्यांसाठी या मीटिंग परिणामकारक करण्याचे तंत्र अवगत असणे अपेक्षित असते. म्हणूनच एम.बी.ए. किंवा तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत 'ग्रुप डिस्कशन' (जी.डी.)चा अंतर्भाव असतोच असतो. कॅम्पस प्लेसमेंटच्या वेळीसुद्धा उमेदवार निवड प्रक्रियेमध्ये जी.डी.चा वापर चाळणी परीक्षा म्हणून केला जातो.

Group Discussion Test अर्थात समूह चर्चा परीक्षा म्हणजे नेमके काय?

तीन किंवा जास्त लोकांनी दिलेल्या विषयावर एका निर्णयाप्रत येईपर्यंत केलेली सर्वसमावेशक, सखोल चर्चा. अशा चर्चेच्या शेवटी Group चे एक सामूहिक मत (Common opinion) तयार होणे हे चांगल्या जी.डी.चे प्रमुख लक्षण समजले जाते.

साधारणतः चार-पाच विद्यार्थ्यांना जी.डी.साठी एकत्र आमंत्रित केले जाते. त्यांना विषय अथवा case study दिला जातो. कधी कधी विषयांचे पर्याय देऊन ग्रुपलाच विषयनिवडीचे स्वातंत्र्य दिले जाते. (तुम्ही कोणता विषय व कशा पद्धतीने निवडता, हासुद्धा परीक्षकांच्या निरीक्षणाचा भाग असतो.) राजकारण, समाजकारण अथवा अर्थकारण (औद्योगिक जगत) यापैकी कुठलाही विषय असू शकतो. विषय एखाद्या विधानाच्या स्वरूपातही असू शकतो व सहभागी उमेदवारांनी त्याच्या बाजूने अथवा विरुद्ध समूहाचे मत बनवायचे असते. 'केस स्टडी' असेल तर समस्येवर उपाययोजना शोधायची असते.

संपूर्ण ग्रुप एकत्रितरीत्या आणि प्रत्येक उमेदवार वैयक्तिकरीत्या पुढील १५ मिनिटे चर्चेमध्ये कसा सहभागी होतो, याचे निरीक्षण परीक्षक करीत असतात. विषयावरचा पडदा काढल्यानंतर २-३ मिनिटे विचार करण्यासाठी दिली जातात.

परीक्षकांना या चर्चेतून काय अपेक्षित असते, हे पाहू या.

GD चे ठळकपणे तीन टप्पे असतात.



सुरवात (Opening) - मध्य (Middle) - शेवट (Closing)

१) तुमची विचार करावयाची/ मुद्दे मांडण्याची पद्धत
२) चेहऱ्यावरचे हावभाव, हातवारे
३) दुसऱ्यांच्या मतावरची तुमची प्रतिक्रिया
४) मुद्द्यांना आव्हान देण्याचे कौशल्य
५) आपला निर्णय दुसऱ्यांना पटवून देण्याचे साम
६) प्रवाही संभाषण कौशल्य

**महेश नारके**

७) भरकटलेल्या चर्चेला दिशा देण्याची कुशलता
८) ऐकण्याचे आणि स्मरण कौशल्य
९) अनुमान, गृहीतक, कल्पना आदींचा सुयोग्य वापर
१०) अचूक निर्णयाप्रत पोचण्यासाठी अवलंबलेली प्रक्रिया
११) तुम्ही नेते (Leader) आहात की अनुयायी (Follower)?

या वेगवेगळ्या कसोट्यांवर परीक्षक तुमच्याविषयी मत नोंदवीत असतात. जी.डी.च्या माध्यमातून आपल्याला पाहिजे तसा उमेदवार निवडणे परीक्षकांना सोपे जाते.

मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांमध्ये GD ची अनावश्यक भीती निर्माण झालेली दिसते. त्याचे एकमेव कारण म्हणजे इंग्रजी बोलण्याची भीती. त्यांना तीच चर्चा मायबोलीतून करावयास सांगितली तर ते आत्मविश्वासाने, न अडखळता बोलतील म्हणजेच त्यांच्याकडे त्या विषयाचे ज्ञान असते; पण इंग्रजी भाषेच्या अपंगत्वामुळे मेंदू Block व जीभ Lock होते. हा अनुभव सार्वत्रिक आहे. यावर इंग्रजीवर प्रभुत्व मिळविणे, हा एकमात्र आणि अनिवार्य उपाय आहे.

जी.डी.मध्ये यशस्वी होण्यासाठीचे तंत्र :

परीक्षकांसमोर जाताना आपण परीक्षेस सामोरे जात आहोत, हे डोक्यातून प्रथम काढून टाकावे. आपण एक जबाबदार, लायक Executive म्हणूनच सहभागी होण्याची मानसिकता असली पाहिजे. त्याचा फायदा असा होतो, की एकतर तुम्ही दिलेल्या विषयाचा त्या मनोभूमिकेतून विचार करता आणि मनावरचा 'परीक्षेचा' अनावश्यक ताण दूर होण्यास मदत होते.

सर्वसाधारण गैरसमज असा की जो जास्त बोलतो तो पास होतो. वास्तविक, Quantity Talking पेक्षा Quality Talking महत्त्वाचे.

(पान ६ पाहा)

Reputed Computer Institute in Kothrud required Faculties for Programming, Graphics, Animation.
Call for walk-in 30915758 / 56206019.

A fast growing Engineering Company having all India customer base requires.

**Walk In Interview**
1) Account cum Office Assistant M/F
2) Receptionist- M/ F
Freshers/ 1-2 yrs exp. in Travel Agency
3) Office Boy
Walk in with resume on 31st Dec. Bet. 10 to 5 pm.
Om Tours & Travels 7B. Anand Complex,

# ‘जी.डी.’तील यशासाठी...

(पान ५ वरून)

विषय मिळाल्यानंतरची २-३ मिनिटे मिळतात तेव्हा जवळच्या कागदावर (बरोबर कोरा कागद आणि पेन असणे अनिवार्य) जेवढे शक्य आहेत तेवढे मुद्दे उतरवावेत. मुद्दे जेवढे जास्त तेवढी रिस्क कमी, कारण तुमच्याकडील बरेचसे मुद्दे इतरांकडेही असण्याची शक्यता असते.

Opening (सुरवात) : Opening matter ची तयारी तुम्ही आधी करू शकता. उदा. ""We are here to discuss the topic & I welcome all of you to contribute your valuable ideas & certainly look forward to positive discussion, May I invite your opinions please.`` अशा प्रकारे दोन ते तीन Opening matters तयार ठेवावेत. फायदा असा, की एकतर तुम्ही तयारी केलेली असल्यामुळे तुमची सुरवात न अडखळता होते व आपोआपच आत्मविश्वासाची पातळी काढून तणाव कमी होण्यास मदत होते. दुसरा फायदा म्हणजे सुरवात केल्यामुळे नंतरची २-३ मिनिटे शांतपणे विचार करण्यास व इतरांच्या मुद्द्यांमधून ‘क्ल्यू’ गोळा करण्यासाठी वापरता येतात.

Case Study असल्यास जास्त आदर्शवादी न राहता Practical Solutions वर भर द्यावा. व्यवहारातील Business Tactics चे तुमचे ज्ञान तपासण्याची परीक्षकांची इच्छा असते.

मध्य : पहिल्या फेरीच्या मुद्दे मांडणीनंतर बऱ्याच वेळा "Group blank` होतो व ‘जी.डी.’ मंद होण्याची भीती असते. अशा वेळी हाताशी असलेल्या मुद्द्यांमधून संयुक्तिक मुद्दे अधिक विस्ताराने मांडण्याचा प्रयत्न करावा. एखादी off-beat पण मुद्द्याला धरून असलेली संकल्पना मांडण्यास ही वेळ उत्तम असते व चर्चा नव्या उत्साहाने पुर्नुज्जीवित होते. मुद्दा मांडताना अथवा दुसऱ्याने मांडलेल्या मुद्द्यास विरोध करताना संबंधित Participant च्या नावाचा आवर्जून उल्लेख करावा. त्यासाठी सर्व Participants ची नावे लक्षपूर्वक ऐकावीत. Corporate Meetings

ध्ये पाळले जाणारे Etiquette's/ Manners ची माहिती करून घेऊन त्यांचे पालन करणे तुमच्या फायद्याचे ठरते. त्यासाठी तुम्ही तुमच्या Seniors/ Alumuni's च्या कायम संपर्कात राहणे गरजेचे ठरेल.

जी.डी.मध्ये अयशस्वी होण्याची कारणे :

१) असंबद्ध बडबड
२) अति आक्रमक वृत्ती
३) अकारण मोठ्या किंवा अगदी हळू आवाजात बोलणे
४) दुसऱ्याचा मुद्दा पूर्णपणे न ऐकता बोलण्यास सुरवात करणे
५) वारंवार व्यत्यय आणणे
६) एखाद्या Participant कडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणे
७) Etiquettes/ Manners चा अभाव
८) मांडलेला मुद्दा अर्धवट सोडून देणे
९) आत्मविश्वासाचा अभाव
१०) घाईघाईत निष्कर्ष काढणे
११) चुकीची माहिती देणे
१२) इतर Participants च्या भावना दुखविणे
१३) गप्प बसणे इत्यादी.

एक लक्षात घ्या, कंपनीला मॅनेजर/ Executive किंवा तत्सम पदावर काम करण्यासाठी तुमची गरज असते. साहजिकच तुमच्यामध्ये नियंत्रित आक्रमकता (Controlled Aggression), प्रतिसाद क्षमता (Responsiveness), चातुर्य (Smartness), सहकार (Co-operation), प्रशंसा (Praise) करण्याचे औदार्य, कल्पना शक्ती (Imagination), नेतृत्व गुण (Leadership) या सर्व गोष्टींचे योग्य मिश्रण असले पाहिजे. (येथे तुमची Basic Managerial Skills गृहीत धरली आहेत.) उपलब्ध असलेल्या १५ मिनिटांमध्ये ते परीक्षकांसमोर ध्वनित करणे तुमच्याकडून अपेक्षित आहे.

Closing (शेवट) : चर्चा सुरू असताना इतरांनी मांडलेले मुद्दे आपण नोंदविले पाहिजेत. कारण त्याचा वापर चर्चा संपवताना होतो. बहुतेक वेळा प्रत्येक सहभागी उमेदवाराला समारोप करावयाची संधी हमखास मिळते. अशा वेळी सर्व मुद्द्यांचा थोडक्यात परामर्श घेणे सोपे जाते व बोलणे प्रभावी होऊन परीक्षकांवर त्याचा सकारात्मक परिणाम होतोच होतो, असा अनुभव आहे.

Emotions : बऱ्याच वेळा GD Test चर्चा तापत जाते आणि परीक्षकांना ‘इम्प्रेस’ करण्याच्या भरात तिला ‘मंडईचे’ स्वरूप येते. कुणाचा पायपोस कुणात राहत नाही व अशी चर्चा सर्वांना (Participants) अपयशी ठरविते. भावनांवर तुमचे पक्के नियंत्रण हवे. आपला मुद्दा कितीही चांगला असला तरी दुसऱ्याने त्यावर केलेल्या टीकेला शांत राहून त्याच्या मताचा आदर करून प्रत्युत्तर द्यावे.

GD Test ची पूर्वतयारी :

वाचन व लेखन हा GD च्या पूर्वतयारीचा अनिवार्य भाग आहे. कार्पोरेट जगताशी नाते सांगणारी वृत्तपत्रे, मासिके, सामाजिक/ राजकारणासारख्या विषयांची मासिके, विविध कंपन्यांची माहिती, त्यांचे ताळेबंद, विशिष्ट उद्योगांमधील सध्याची परिस्थिती, World Market & Recent Trends यावरचे वाचन तुमची ज्ञानकक्षा विस्तारत असते. तुमच्याकडील माहिती अचूक व आकडेवारीने समृद्ध असल्यास त्याचा फायदा GD ध्ये निश्चितच होतो. तुमच्या क्षेत्राशी संबंधित प्रकाशित होणारी माहिती मग ती लेखांच्या स्वरूपात असो किंवा स्तंभ लेखनाच्या स्वरूपात असो, तिचा संग्रह करणे भविष्यात उपयोगी ठरेल. अशा माहितीमध्ये एखाद्या विषयाचे समीक्षण किंवा घटनेचे समालोचन केलेले असते. अशा प्रकारचे वाचन करताना मनातल्या मनात तुम्हीसुद्धा स्वतःचे मत मांडण्याचा प्रयत्न करा. लिहून काढल्यास उत्तमच. अशा पद्धतीने तुमची विचारांची बैठक पक्की होऊन विचारप्रक्रिया गतिमान होण्यास सुरेख चालना मिळेल. TV वरचे विश्लेषणात्मक कार्यक्रम, वादविवाद आवर्जून पाहावेत व महत्त्वाची माहिती लिहून ठेवावी.

आपण मित्रांमध्ये वेगवेगळ्या विषयांवर गप्पा कायमच मारतो; परंतु त्यांना Corporate Group Discussion च्या चौकटीत बसविता आल्यास (Mock GD) तुमच्या तयारीस हातभार लागेल. GD यशाचे समीकरण मांडावयाचे झाल्यास ते असे असावे.

(विचारांची सुस्पष्टता + अचूक माहिती + वाजवी संभाषण कौशल्ये) स आत्मविश्वास = जीडी मधील यश! ■